Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10| October - 2025

Original Article

# ग्रामीण विकासात कृषी व कृषीपूरक व्यवसायाचे महत्व

**प्रा.पंढरी जी.मोरे[1], डॉ.विठ्ठल एन.ठावरी[2]**
[1]प्रिन्सिपल अरुणराव कलोडे महाविद्यालय नागपूर
[2]अर्थशास्त्र विभाग प्रमुख कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी त.चिमूर जि.चंद्रपूर
**Email:** more.pandhari@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-171027
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 10
Pp. 120-124
October. 2025
**Submitted:** 19 Sept. 2025
**Revised:** 29 Sept. 2025
**Accepted:** 14 Oct. 2025
**Published:** 31 Oct. 2025

***गोषवारा***

*ग्रामीण विकास हा कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण पाया मानला जातो.भारतासारख्या कृषी प्रधान व उद्योग प्रधान देशामध्ये ग्रामीण क्षेत्रातील अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार कृषी व कृषी पूरक व्यवसाय हे आहेत.मात्र हे दोन्ही घटक ग्रामीण भागातील लोकसंख्येच्या उत्पन्न,रोजगार,अन्न सुरक्षा आणि औद्योगिक विकासात महत्वपूर्ण कार्य करीत आहेत.भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने सुमारे ६५ ते ७० टक्के लोक ग्रामीण भागात वास्तव्य करीत आहेत.आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया मुख्यत्वे करून कृषी व कृषी पूरक व्यवसायाशी सबंधित असणाऱ्या व्यवसायावर अवलंबून आहेत.भारतातील ग्रामीण क्षेत्राशी संबंधित असणारा कृषी हा व्यवसाय केवळ अन्नधान्य उत्पादनाचे साधन नाहीत.तर रोजगार,उद्योग विकास, अन्नसुरक्षा आणि सामाजिक स्थैर्याचे मुख्य साधन आहेत.अलीकडील काळात शेतीवर आधारित असणारे पूरक व्यवसाय उदा.दुग्ध व्यवसाय,कुक्कुटपालन,फळप्रक्रिया,सेंद्रिय शेती आणि कृषी पर्यटन यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला नवीन आर्थिक आयाम मिळवून दिले आहेत.*

## प्रस्तावना

भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने ग्रामीण क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या लोकसंख्या ६५ ते ७० एवढी असली तरी मात्र ग्रामीण लोकांच्या जीवनमानाचा पाया हा कृषी व कृषीपूरक व्यवसाय आहेत.कृषी हे केवळ अन्नधान्य उत्पादनाचे साधन नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मुख्य आधार स्तंभ आहेत.

ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण क्षेत्रातील लोकांचे आर्थिक,सामाजिक,आणि सांस्कृतिक जीवनमान उंचाविणे होय.ग्रामीण विकासाचा पाया मजबूत करण्यासाठी कृषी आणि कृषी पूरक व्यवसायाची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण ठरते.कृषी क्षेत्राच्या माध्यमातून प्राप्त होणारे उत्पादन,उत्पन्न,आणि रोजगार हे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचे महत्वाचे साधन आहेत.कृषी पूरक व्यवसाय उदा.दुग्ध व्यवसाय,कुक्कुटपालन,मत्सपालन,मधमाशी पालन,फळप्रक्रिया उद्योग,सेंद्रिय शेती आणि पर्यटन इत्यादीमुळे ग्रामीण भागातील मूल्यवर्धन आणि रोजगार निर्मिती घडवून आणण्याचे कार्य करीत असते.त्यामुळे ग्रामीण भागात आर्थिक स्थैर्य निर्माण होत असते.आणि ग्रामीण शाश्वत विकासाला चालना मिळते.

आजच्या आधुनिक काळात ग्रामीण विकास घडवून आणण्यासाठी पारंपारिक शेती व्यवसायावर अवलंबून न राहता कृषी पूरक व्यवसायाचा विकास करणे अत्यंत गरजेचे असल्याचे दिसून येते.या क्षेत्रामध्ये तंत्रज्ञान,संशोधन,विपणन ओ सरकारी योजनांचा योग्य वापर केल्यास ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम आणि आत्मनिर्भर होऊन आर्थिक विकासाला चालना मिळते.म्हणूनच ग्रामीण विकासाच्या सर्वांगीण प्रक्रियेत कृषी व कृषी पूरक व्यवसायाचे आर्थिक महत्व अत्यंत महत्वपूर्ण व मोलाचे ठरते.कृषी व कृषी पूरक व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेचे अत्यंत महत्वाचे केंद्रबिंदू आहेत. हे दोन्ही घटक ग्रामीण भागातील लोकांना रोजगार,उत्पन्न आणि स्थैर्य प्रदान करीत असतात.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17638803
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*प्रा.पंढरी जी.मोरे, प्रिन्सिपल अरुणराव कलोडे महाविद्यालय नागपूर*

**How to cite this article:**
*मोरे, . पंढरी . जी ., & ठावरी, . विठ्ठल . एन . (2025). ग्रामीण विकासात कृषी व कृषीपूरक व्यवसायाचे महत्व. Journal of Research and Development, 17(10), 120–124. https://doi.org/10.5281/zenodo.17638803*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10| October - 2025

त्यामुळे शेतीशी सबंधित उद्योग जसे की दुग्ध प्रक्रिया,तेल गिरण्या,फळप्रक्रिया,मधमाशी पालन,आणि मत्सपालन हे भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाचे नवीन स्तंभ बनलेले आहेत.या व्यवसायामुळे ग्रामीण भागातील स्वयंरोजगार,उद्योजकता,मूल्यवर्धन आणि बाजारपेठेचा विस्तार मोठ्या प्रमाणात घडून आलेला आहेत.त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा रस्ते,वीज,पाणी,कोल्ड स्टोरेज,बाजारपेठा यांचाही मोठ्या प्रमाणात विकास घडून येतो.या सर्वामुळे ग्रामीण भागात आर्थिक समृद्धी,सामाजिक स्थैर्य,स्थलांतरण कमी होणे आणि शाश्वत विकास सुद्धा साध्य होत असतो.म्हणूनच कृषी व कृषी पूरक व्यवसाय ग्रामीण विकासासाठी एक अत्यावशक घटक म्हणून सिद्ध होत आहेत.

**कृषी आणि कृषी पूरक व्यवसायाचे आर्थिक महत्व :**

**1)रोजगार निर्मिती :**

ग्रामीण भागामध्ये जवळपास ६० ते ७० टक्के लोकसंख्या कृषी आणि कृषी पूरक व्यवसायावर अवलंबून आहेत. पशुपालन,दुग्ध व्यवसाय,मत्सपालन, कुक्कुटपालन,मधमाशी पालन,शेती उत्पादन प्रक्रिया इत्यादी क्षेत्रामुळे मोठ्या प्रमाणात अर्धवेळ आणि पूर्णवेळ रोजगार निर्माण होत आहेत.

**2)ग्रामीण उत्पादन :**

ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचे मुख्य उत्पन्नाचे स्त्रोत कृषी व कृषी पूरक व्यवसाय आहेत.त्याचप्रमाणे शेत उत्पादन विक्रीबरोबरच त्यावर आधारित प्रक्रिया उद्योग जसे की तांदूळ मिल,तेल गिरणी,दुग्ध प्रक्रिया केंद्र यामुळे स्थानिक पातळीवर उत्पन्न व बचत मोठ्या प्रमाणात वाढते.

**3)ग्रामीण उद्योगांना चालना :**

कृषी पूरक उद्योगामुळे लघु व घरगुती ग्रामीण उद्योगाचा विकास होतो.कृषी उत्पादनांवर आधारित उद्योगांमुळे मूल्यवर्धन होते.आणि शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर नफा प्राप्त होतो.

**4)अन्नसुरक्षा व आत्मनिर्भरता :**

कृषी क्षेत्रामुळे अन्नधान्य,भाजीपाला,फळे,दुध,मांस,अंडे इत्यादी उत्पादनांद्वारे देशातील अन्नसुरक्षा सुनिश्चित होते.आणि स्थानिक पातळीवर उत्पादन झाल्यामुळे आत्मनिर्भरतेला प्रोत्साहन मिळत असते.

**5)ग्रामीण पायाभूत सुविधांचा विकास :**

कृषी क्षेत्राशी संबंधित गुंतवणुकीच्या वाढीमुळे रस्ते, वीज, पाणी, गोदामे, कोल्डस्टोरेज बाजारपेठांचा विकास व्हायला लागतो.त्यामुळे एकंदरीत ग्रामीण जीवनमान सुधारायला लागते.

**6)निर्यात व परकीय चलन मिळविणे :**

कृषी आणि कृषी पूरक उत्पादन (उदा.मसाले,सुकामेवा,दुधजन्य पदार्थ,फळे,फुल) यांच्या निर्यातीमुळे विदेशी चलन प्राप्त होत असते.आणि त्यामुळे ग्रामीण उत्पादकांना जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळत असतो.

**7)पर्यावरणीय संतुलन राखणे :**

वृक्षारोपण,जलसंवर्धन,पशुपालन यामुळे पर्यावरण संतुलन राखण्यात येते.आणि हे ग्रामीण शाश्वत विकासासाठी आवश्यक आहेत.

**8)सामाजिक स्थैर्य आणि समृद्धी :**

कृषी व कृषी पूरक व्यवसायाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरिबी कमी होते.शहरी स्थलांतरण घटते आणि ग्रामीण भागात सामाजिक स्थैर्य निर्माण होत असते.तसेच ग्रामीण भागातील स्त्रिया आणि युवकांसाठी उद्योजकतेच्या नवीन संधी उपलब्ध होत असतात.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

या संशोधनाचा मुख्य उद्देश्य ग्रामीण भागातील आर्थिक विकासात कृषी व कृषीपूरक व्यवसायांचे योगदान तपासणे व त्याचा परिणाम विश्लेषित करणे,यांची तपशीलवार उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

1. ग्रामीण विकासात कृषी क्षेत्राचे आर्थिक योगदानाचा अभ्यास करणे.
2. कृषी पूरक व्यवसायांचे(दुग्धव्यवसाय,मत्सपालन,कुक्कुटपालन,फळ प्रक्रिया,मधमाशी पालन इत्यादी)ग्रामीण अर्थव्यवस्थेत स्थान विश्लेषण करणे.
3. ग्रामीण लोकसंख्या उत्पन्न व रोजगार वाढीत कृषी पूरक व्यवसायाची भूमिका तपासणे.
4. ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्वावलंबनात कृषी व कृषी पूरक व्यवसायाची भूमिका अभ्यासणे.
5. ग्रामीण उद्योग विकासात मूल्यवर्धन प्रक्रिया आणि तंत्रज्ञानाचा वापर यांचा प्रभाव शोधणे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10| October - 2025

6. सरकारी योजना,धोरणे व सहाय्यक यांचा कृषिपूरक व्यवसायांच्या प्रगतीवरील परिणाम यांचे विश्लेषण करणे.
7. ग्रामीण विकासासाठी कृषी पूरक उद्योगांना बळकटी देण्यात आवश्यक उपाय सुचविणे.

**संशोधनाची गृहीतकृत्ये :**

संशोधनाची गृहीतकृत्ये खालीलप्रमाणे आहेत.

1. कृषी व कृषी पूरक व्यवसायांचा ग्रामीण विकासावर लक्षणीय सकारात्मक प्रभाव आहेत.
2. कृषी पूरक व्यवसाय ग्रामीण भागात स्थिर रोजगार ई उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करतात.
3. कृषी पूरक उद्योग ग्रामीण महिलांच्या सामाजिक -आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणतात.
4. सरकारी धोरण आणि सहाय्यक योजना कृषी पूरक व्यवसायाच्या वृद्धीत महत्वाची भूमिका बजावतात.
5. तंत्रज्ञान व प्रशिक्षणाचा वापर केल्यास कृषी पूरक उद्योगांची उत्पादकता आणि नफा वाढतो.
6. ग्रामीण भागातील आर्थिक असमानता कमी करण्यासाठी कृषी पूरक व्यवसाय प्रभावी ठरतात.

**संशोधनाचा आढावा :**

ग्रामीण विकास, कृषी आणि कृषी आणि कृषी पूरक व्यवसाय या विषयांवर अनेक संशोधकांची अभ्यास करून ग्रामीण अर्थव्यस्थेतील त्यांचे आर्थिक महत्व स्पष्ट केले आहेत.या संशोधनाचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आलेला आहेत.

**1.रेड्डी एस.सुब्बा आणि रघुराम :**

यांनी कृषी क्षेत्राचे राष्ट्रीय उत्पन्नात असलेले योगदान ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती यावर सखोल विवेचन केले आहेत.की भारताच्या एकूण देशांतर्गत उत्पादनामध्ये (जी.डी.पी.) कृषीचा सुमारे १८ ते २० टक्के वाटा असून ग्रामीण भागातील ६० टक्के लोकसंख्या थेट शेती या व्यवसायावर अवलंबून आहेत.

**2.सी.एस.वेंकटा रेड्डी-२०१७ :**

या संशोधनात कृषीपूरक व्यवसाय उदा.दुग्ध व्यवसाय,मत्सपालन,फळ प्रक्रिया उद्योग,यांचा ग्रामीण विकासावर होणारा सकारात्मक परिणाम लक्षात घेतला आहेत.या क्षेत्रामुळे ग्रामीण महिलांमध्ये उद्योजकता आणि अत्मानिर्भरतेची भावना निर्माण झाली आहेत.

**3.डॉ.पंजाबराव देशमुख-१९५८**

ग्रामीण भागातील कृषी समस्यांचा आणि त्यांच्या आर्थिक परिणामांचा सखोल अभ्यास केला आहेत.की कृषी पूरक उद्योगांच्या माध्यमातून ग्रामीण भागात स्थिर उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होत आहेत.आणि यामुळे ग्रामीण भागातील लोकांचे शहराकडील स्थलांतरण कमी होत आहेत.

**4.दांडेकर समिती अहवाल-१९७१**

दांडेकर समितीने ग्रामीण भागातील गरीबीचे मुख्य कारण म्हणजे कृषी उत्पादनातील अनिश्चीतता व त्यावरील अवलंबित्व असल्याचे नमूद केले आहेत.समितीने कृषी पूरक उद्योगांचा विकास केल्यास ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक स्थिर आणि उत्पादनक्षम बनेल असे सुचविलेले आहेत.

**5.डॉ.एम.एस.स्वामीनाथन-२००६ :**

यांनी आपल्या अहवालात ग्रामीण विकासासाठी शाश्वत कृषी पध्दती.जैव विविधता संवर्धन आणि मूल्यवर्धन प्रक्रिया यांचे महत्व प्रतिपादित केलेले आहेत.त्यांनी आपल्या वक्तव्यात कृषी विकास म्हणजे ग्रामीण भारताचा विकास ही भूमिका मांडली आहेत.

**6.राष्ट्रीय कृषी धोरण-२००६ :**

या धोरणानुसार कृषी व कृषी पूरक क्षेत्रांना आधुनिक तंत्रज्ञान,बाजारपेठ,पायाभूत सुविधा व प्रशिक्षण उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहेत.ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था सशक्त बनेल.

**7.मिनिस्ट्री आफ रुरल डेवेलोपमेंट-२०२२**

यांच्या अहवालानुसार शेती बरोबरच कृषी पूरक क्षेत्रांनी ग्रामीण उत्पन्नात ३० टक्के वाढ केल्याचे नोंदविण्यात आलेले आहेत.तसेच महिला सहभाग,युवा उद्योजकता आणि स्थानिक उद्योग विकास हे ग्रामीण विकासाचे नवीन परिणाम ठरले आहेत.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10| October - 2025

**कृषी आणि कृषी पूरक व्यवसायाचा विकास हा ग्रामीण विकासाचा पाया :**

भारत कृषी प्रधान व्यवसायाबरोबरच उद्योगप्रधान देश आहेत.ग्रामीण समाजाचा आर्थिक,सामाजिक आणि सांस्कृतिक विकास कृषी आणि कृषी पूरक उद्योगांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत.त्यामुळे या क्षेत्राचा विकास झाल्याशिवाय ग्रामीण विकास साध्य होऊ शकत नाही.

**१.ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार :** आधुनिक काळात ग्रामीण भागातील बहुसंख्य लोक हे कृषी व कृषी पूरक व्यवसायामध्ये गुंतलेले आहेत.कृषी क्षेत्रातून अन्नधान्य कच्चा माल आणि रोजगार सुद्धा मिळतो.जे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मुख्य घटक आहेत.

**२.कृषी पूरक उद्योगांचे योगदान:** दुग्ध व्यवसाय,मत्सपालन,कुक्कुटपालन,मधमाशीपालन,बागायती,फळ व भाजीपाला प्रक्रिया,रेशम उद्योग इत्यादी व्यवसाय ग्रामीण भागात स्थिर उत्पन्नाचे व रोजगाराचे स्त्रोत निर्माण करतात.

**३.रोजगार आणि उत्पन्न वाढ :** शेतीतील मोसमनिहाय कामामुळे वर्षभर रोजगार मिळत नाही.परंतु कृषी पूरक व्यवसायांमुळे शेतकरी आणि ग्रामीण युवकांना संपूर्ण वर्षभर काम मिळते आणि त्यांचे उत्पन्न स्थिर राहते.

**४.महिलांचा सहभाग आणि सबलीकरण :** कृषी पूरक व्यवसायामध्ये (दुग्ध व्यवसाय,हस्तकला,प्रक्रिया उद्योग) ग्रामीण महिलांचा मोठा सहभाग असतो.त्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन महिला सबलीकरण साध्य होते.

**५.स्थानिक उद्योग व मूल्यवर्धन :** कृषी उत्पादनांचे स्थानिक पातळीवर प्रक्रिया उद्योगात रूपांतरण केल्यास उत्पादनांना अधिक किमत मिळते. आणि स्थानिक बाजारपेठ मजबूत होते.त्यामुळे ग्रामीण उद्योगांना चालना मिळत असते.

**६.स्थलांतर नियंत्रण:**ग्रामीण भागात कृषी पूरक व्यवसाय उपलब्ध असल्याने लो शहरांकडे स्थलांतर न करता गावातच रोजगार मिळवीत असतात.त्यामुळे सामाजिक स्थैर्य टिकते.

**७.शाश्वत ग्रामीण विकास:** कृषी व कृषी पूरक व्यवसायाचा विकास झाल्यास ग्रामीण भागातील जीवनमानात सुधारणा होत असते.रोजगारात वाढ होते.उत्पन्नाचे वितरण समतोल राहते.आणि पर्यावरणीय विकास साध्य होतो.हेच शाश्वत विकासाचे मूळ तत्व आहेत.

**ग्रामीण भागातील कृषी व कृषी पूरक व्यवसायाचे योगदान**


| अ.क्र. | घटक/क्षेत्र | ग्रामीण अर्थव्यवस्थेतील योगदान % | मुख्य प्रभाव |
|---|---|---|---|
| १. | शेती(कृषी उत्पादन) | ४५% | अन्नधान्य,रोजगार,उत्पन्न |
| २. | दुग्ध व्यवसाय | १८% | दुध व दुग्धजन्य उद्योग,महिला रोजगार |
| ३. | कुक्कुटपालन | १०% | अंडी व मांस उत्पादन,ग्रामीण उद्योग |
| ४. | मत्स्यपालन | ७% | आहारपूरक व निर्यात उत्पादन |
| ५. | मधमाशी पालन | ५% | मध,पराणसिंचन,पर्यावरणीय संतुलन |
| ६. | फळ व भाजीपाला प्रक्रिया उद्योग | ८% | मूल्यवर्धन,लघु उद्योग विकास |
| ७. | सेंद्रिय शेती व कृषी पर्यटन | ७% | शाश्वत विकास,आत्मनिर्भरता |

**कृषीपूरक व्यवसायामुळे निर्माण होणाऱ्या रोजगाराचे स्वरूप:**


| क्षेत्र | थेट रोजगार % | अप्रत्यक्ष रोजगार % | एकूण ग्रामीण रोजगारात योगदान |
|---|---|---|---|
| शेती | ४०% | १५% | ५५% |
| दुग्ध व्यवसाय | २०% | १०% | ३०% |
| कुक्कुटपालन | ८% | ५% | १३% |
| मस्त्य पालन | ५% | २% | ७% |
| इतर(मध प्रक्रिया,कृषी पर्यटन | ३% | २% | ५% |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10| October - 2025

**ग्राफ-१: ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी व कृषी पूरक क्षेत्रांचे योगदान%**




**ग्राफ-२ : कृषी पूरक व्यवसायामुळे ग्रामीण रोजगारात वाढ**




**मूल्यमापन:**

ग्रामीण विकास साधण्यासाठी केवळ पारंपारिक शेती पुरेशी नाहीत,तर शेती सोबतच कृषी पूरक व्यवसायांचा समन्वित विकास हा ग्रामीण अर्थव्यवस्थेला स्थैर्य रोजगार व आत्मनिर्भरता देणारा परिणामकारक मार्ग आहे.कृषी पूरक उद्योगामुळे ग्रामीण भागातील उत्पन्नाचे स्त्रोत वाढतात.महिलांचा सहभाग वाढतो.आणि शाश्वत ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी ही दिशा अत्यंत महत्वपूर्ण ठरत असते.

**संदर्भ ग्रंथ**

1. डॉ.पू.ल.भांडारकर,सामाजिक संशोधन पध्दती,मंगेश प्रकाशन नागपूर.
2. कुलकर्णी बी.डी.आणि ढेरढेरे एस.व्ही.,अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती,डायमंड पब्लिकेशन,पुणे-२०१०
3. कऱ्हाडे.बी.एस.शास्त्रीय संशोधन पध्दती पिंपळापुरे आणि कंपनी पब्लिकेशन-२०१०
4. रेड्डी.एस.सुब्बा आणि रघुराम कृषी अर्थशास्त्र ऑक्सफर्ड आणि आय.बी.एच.पब्लिशिंग,नवी दिल्ली.
5. सी.एस.वेंकटा रेड्डी.कृषी व्यवसाय आणि ग्रामीण व्यवस्थापन हिमालया पब्लिशिंग हाऊस-२०१७
6. देशमुख डॉ.पंजाबराव,भारतीय कृषी- समस्या आणि संभावना भारत सरकार पब्लिकेशन-१९५८
7. स्वामीनाथन.एम .एस.भारतातील शाश्वत शेती,नशनल कमिशन ऑन फार्मर रेपोर्ट-२००५
8. दांडेकर समिती अहवाल,भारतातील कृषी विकास आणि धोरण-१९७१
9. मिनिस्ट्री ऑफ रुरल डेवलोपमेंट गर्वमेंट ऑफ इंडिया,ग्रामीण विकास अहवाल-२०२२
10. नशनल अग्रीकल्चरल पालीसी डाकूमेंट,गर्वमेंट ऑफ इंडिया-२००६
11. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी-२०१० ते २०२०
12. चंद्रपूर जिल्ह्याची आर्थिक पाहणी -२०१० ते २०२०